## माहितीचा अधिकार अधिनियम 2005
## बृहन्मुंबई महानगरपालिका
## उप आयुक्त (अभियांत्रिकी) यांची माहिती पुस्तिका
## प्रस्तावना

1. या हस्तपुस्तिकेच्या पार्श्वभूमीवर लक्षात घ्यावयाच्या बाबींविषयी (माहितीचा अधिकार अधिनियम 2005)

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतूदींनुसार ही हस्तपुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेत हस्तलिखिते क्र.1 ते 17 चा समावेश असून, त्यात संस्थेची तपशीलवार माहिती, कार्य आणि कर्तव्ये, अधिका-यांचे व कर्मचा-यांचे हक्क आणि कर्तव्ये, नियम, अधिनियम, सूचना, अभिलेख इ. बाबी तसेच कार्याची अंमलबजावणी करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेची तपशीलवार माहिती, प्रत्येक अधिका-याचे मासिक वेतन, अंदाजपत्रक यांचा अंतर्भाव आहे. यामुळे नागरिकांना उपायुक्त (अभियांत्रिकी) खात्यासंबंधी महत्वपूर्ण माहिती उपलब्ध होईल.

2. वस्तुनिष्ठ पुस्तिकेचा हेतू :

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभाराची पारदर्शकता साधणे व कार्याचा आढावा सर्वसामान्यांसही घेता येणे.

3. या पुस्तिकेचा वापर कोण करु शकतो?

कोणीही, अगदी सर्वसाधारण नागरिकही या पुस्तिकेचा वापर करु शकतो.

4. हस्तपुस्तिकेमध्ये उपलब्ध होणा-या संस्थांची माहिती :

बृहन्मुंबई महानगरपालिका :- उपायुक्त (अभियांत्रिकी) खाते

5. हस्तपुस्तिकेत वापरण्यात आलेल्या व्याख्या :

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतूदीनुसार नियुक्ती करण्यात आलेला वैधानिक अधिकारी

6. हस्तपुस्तिकेत समाविष्ट केलेल्या मुद्दयांबाबत ज्यांना अधिक माहिती तसेच इतर पूरक माहिती मिळवायची असल्यास त्यासाठी निश्चित केलेल्या व्यक्ति :

उपायुक्त (अभियांत्रिकी) खात्याचे प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी

7. या हस्तपुस्तिकेत उपलब्ध असलेल्या माहितीव्यतिरिक्त माहिती उपलब्ध करण्याची पध्दत आणि आकारावयाच्या शुल्काबाबत :

आवश्यक माहितीसाठी रु.10/- चा कोर्ट फी स्टँप लावून उपायुक्त (अभियांत्रिकी) यांचे प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, उपायुक्त(अभियांत्रिकी) यांचे कार्यालय, इंजिनिअरींग हब इमारत, पहिला मजला, डॉ.ई. मोझेस रोड, वरळी नाका, वरळी, मुंबई - 400 018 यांचेकडे अर्ज करु शकतात. सदर अर्जान्वये मागितलेल्या माहितीसाठी प्रति पृष्ठ रु.2/- इतका आकार आहे. अर्ज टपालान्वये पाठवायचा असेल तर त्यासाठी यथायोग्य आकाराचा स्टँप लावून करावा लागेल.

उप आयुक्त (अभि.) यांचे प्रशा.अधि.